म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २३७८

# दस्तख़त



REFBK-0022336
REFBK-0022336

प्रकाश जाधव

२१८९८
का॰य
२२३३६
२१०५५
२३७०

# दस्तख़त

प्रकाश जाधव

REFBK-0022336
REFBK-0022336

(C) प्रकाश जाधव

**किंमत । पांच रुपये ।**

**प्रकाशक ।**

'दलित साहित्य संसद' प्रकाशन ।
७/१३४, जयविश्रान्त । सहकार नगर । पांच ।
चेंबूर, ४०० ०७१ ।

**प्रथमावृत्ती ।**

एक जानेवारी । एकोणीसशे अठ्याहत्तर ।

**मुद्रक ।**

ग. वि. सावंत ।
प्रगति प्रिंटींग प्रेस । मुगभाट लेन ।
गिरगांव, ४०० ००४ ।

**मुखपृष्ठ ।**

प्रकाश जाधव । किशोर चव्हाण ।

# प्रस्तावना

८ जानेवारी १९७७ रोजी लोणावळा येथे ' दलित साहित्य संसद ' मुंबईच्या वतीने, दोन दिवसाचें मुक्तचर्चा शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात पहिल्या रात्री जो कविता वाचनाचा कार्यक्रम झाला त्यामध्ये प्रकाश जाधवच्या ' दादर पुलाखाली ' या कवितेने सर्वांनाच अस्वस्थ करून सोडले होते उपेक्षित जीवनाचे एक भन्नाट चित्रण अत्यंत समर्थ आणि रोखठोक भाषेत त्याने केले होते.

गेल्या तीन चार वर्षात दलित साहित्य चळवळीच्या प्रवाहाला अनेक नवे चेहरे येऊन मिळाले आहेत. त्यापैकी सुरेश कदम, प्रबोध करंदीकर, भीमसेन देठे प्रकाश जाधव, पांडुरंग कदम, शंकर खरात, प्रकाश खरात, किरण तांबे, अर्जुन कांबळे, सुधाकर गायकवाड, उमेश जाधव, धर्मराज निमसरकर, चंद्रकांत वानखेडे, मीना गजभिये आणि अशी कितीतरी नावे घेता येतील. संसद, निकाय, अस्मितादर्श आणि सिंहगर्जना इत्यादी नियतकालिकातून, हे सर्व तरूण दलित साहित्य चळवळीची दिशा प्रकाशमान करीत आहेत. प्रकाश जाधव हे या नामावलींतील एक ठळक नाव.

दलित साहित्य चळवळीत कविता खुप मोठ्या संख्येनं लिहली जात आहे. आजपर्यंतच्या दलित कवींचे प्रकाशित कवितासंग्रह पाहिल्यास असे दिसून येईल किं, दलित कवितेने मराठी कवितेचा चेहरामोहराच बदलून टाकला आहे. उपेक्षित जीवन शब्दबद्ध करणारा अविष्कार, आजच्या साहित्यिक वाटचालीत आपले पाऊल स्पष्टपणे उमटवीत आहे. याच उपेक्षित जीवनाचा, शोषितांचा, पिडीतांचा, दलितांचा शब्दबद्ध अविष्कार घेऊन प्रकाश जाधव पुढे येत आहे. आणि त्या अविष्काराचे नाव आहे 'दस्तखत'.

प्रकाश जाधव हा पंचविशीच्या आसपासचा कवी. स्वतः विषयी आणि स्वतःच्या कविते विषयी देखील कमीत कमी बोलणारा. एअर इंडिया मधील एक

दस्तखत : एक

साधा कामगार. आजच्या काही विद्यापिठीय मूल्यांनी वेढलेल्या आणि त्याच्च दडपणाखाली वावरणाऱ्या कवींच्या, कविता निर्मितीच्या पार्श्वभूमीवर प्रकाशची कविता लक्षणीय ठरणारी आहे. पारंपारिक मराठी कवितांनी घालून दिलेली कुंपणे आजवरच्या दलित कवींनी मोडून टाकली आहेत. प्रकाश हा त्यापैकीच एक. कुंपणा पलिकडेही एक जग आहे. त्या जगाला स्वतःचे असे भावविश्व आहे. शोषण आहे. दुःख आहे आणि संघर्षसुद्धां. ही जमिन जी पिडीतांची आहे. दलितांची आहे. त्या भूमीवर पहिले पाऊल दलित साहित्यिकांनीच ठेवले आहे. तिथल्या अविष्करणाची ही नुकतीच कुठे सुरवात आहे. यानंतरही तिथल्या दुःख, दास्यांचे कितीतरी पदर उलगडले जाणार आहेत. आणि याच संघर्षात ठाम उभा असलेला कविता संग्रह म्हणजे, ' दस्तख़त. '

काही अपवाद वगळता दलित कवितेतील अनुभव साधारणतः गावकुसा-बाहेरील दलितांवर होणारे अन्याय, अत्याचार, चातुवर्ण्य व्यवस्थेमुळे होणारी मानहानी, नाकेबंदी आणि या सर्वांची परिणीती म्हणजे, या सर्वाविरुद्धच्या संघर्षात त्याने घेतलेल्या लढाऊ पावित्र्याचे ठोस दर्शन. गावकुसाबाहेरील दलित जीवनाचे जसे वेगळे अनुभव, वेगळे संदर्भ असतात. तसेच शहरांतील दलित जीवनांचे अनुभव विश्व आणि संदर्भ वेगळे असतात. अर्थात दोन्हीतील दुःख हे अंतिमतः सारखेच. दस्तख़त मधल्या अनुभव विश्वात गलीकुच्या, दैन्य, दास्य, विटंबना, वेश्या, राडे, रामपुरी, कडकडे, दादा, वेडे, हिजडे, मौला, बाबा, फकिर, अघोरी, चोर, दरोडेखोर, भिकारी, महारोगी, चक्री, मटका, तीन पत्ते, जन्नामन्ना, मशिदी, देवळे, चर्च, संप, मोर्चे, टाळेबंदी, लाठीचार्ज, अश्रूधूर, कर्फ्यू, तस्करी, काळाबाजार, पोलीस यंत्रणा आणि राजकिय स्थित्यंतर हे सगळे संदर्भ येतात. परंतु हे अनुभव अथवा संदर्भ केवळ आणायचेच म्हणून आलेले दिसत नाहीत तर, हे संदर्भ कवी आणि त्याची कविता यामध्ये एक जिव्हाळ्याचे नाते निर्माण करतात. हे सगळे एकमेकांकडे ओढले जातांना. एकमेकात गुंतत जातांना आढळतात. सर्व कविता वाचल्यानंतर जाणवते कि; अंर्तमन पोखरणाऱ्या या अथर्विय जगात कवी, कोणतंही कातडं न पांघरता जगला आहे. ' दस्तखत ' मधील अथवा एकूण

दलित कवितेतील अंतरजग पाहिले तर, मराठी कवितेत जें साचलेपण होते. एक शिष्ट वलय होते. ते फोडण्याचे काम दलित कवितेने केले असून तिच्या मर्यादा अधिक विस्तृत केल्या आहेत.

'दस्तखत' मधील एक वेगळेपण विशेष नजरेत भरतं ते म्हणजे, कवीने आपण 'कवी' आहोत अशी पोज कुठेही घेतल्याचं जाणवत नाही. कवी देखील सर्वप्रथम माणूस असतो सर्वसामान्यांप्रमाणे त्यालाही सुखदुःखे भोगावी लागतात. संघर्ष करावा लागतो. खडतर वास्तवाचा तो सुद्धां एक भागिदार असतो. ही भरपूर जाण प्रकाशला असल्यामुळेच अनुभवात आणि कवितेत कोणत्याही प्रकारच्या काल्पनिक भिंती उभ्या रहातांना दिसत नाहीत. अथवा वास्तवाकडे पहाण्याची आणि त्याला अर्थ लावण्याची स्वच्छ दृष्टी यामुळे अनुभव, वास्तव, अविष्कार कुणीच कुणापासून फारकत घेतांना आढळत नाही.

जीवनाचा अर्थ आम्हाला समजला आहे. असा उद्घोष करणारे विचारवंत जेव्हां गुळगुळीत 'अध्यात्मिक' भाषेत जीवनाचा अर्थ सांगतात तेव्हां, प्रकाश सारखा खराखुरा जीवन जगलेला कवी त्यांना उद्देशून म्हणतो.

**तीन पत्त्यांची गोची कळत नाहीय असामान्यांना**
**जन्मामन्न्याची कालाकांडी**

किंवा

**या असंबद्ध रात्रींचे संदर्भ लागत नाहीत तात्विकांना**
**चार भिंतीतल्या सांद्र उजेडात**
**त्यांच्या सर्वदूर विचारांची उत्तुंग झेप औपचारिक अन सरड्या एवढी**
**जिने उतरून खाली आल्याशिवाय**
**दिसणार नाही हा अपारदर्शी अंधार**

प्रकाश जिने उतरून रस्त्यात भटकणारा कवी आहे. जनसामान्यांच्या, दलितांच्या दुःखांचा सहजच तो एक भाग होत जातो. माणुसकीला मान घालायला

लावणारी क्रूर समाजव्यवस्था तो पहातो तेव्हां, त्याची कविता वास्तवतेचे तितकेच समर्थ आणि भिषण चित्र उभे करतांना म्हणते.

**आकाश वेगळी झिपरी रज हुडकीत**
**कचऱ्याच्या ढिगाआड बुडतांना**
**लाख उमर खय्याम जागे होतात स्वप्नातून**
**सच्चा वास्तवापुढे होकूसायची चित्रे आखूड वाटू लागतात**
**अन् विसंगत.**

कचऱ्याच्या ढिगात अन्न शोधणारी भूतावळ पाहून प्रकटणारी कवीची प्रतिभा लाखो उमर खय्यामची झोप उडवून थांबत नाही तर काळजावर व्रणासारख्या राहिलेल्या जखमा. दिलेली लांच्छनास्पद वागणूक आणि आतल्या आंत काहीतरी खदखदत, घुसमटत असल्याचं जाणवत रहातं. त्याचप्रमाणे ही व्यवस्थाच बदलायला हवी. हा बंडखोर विचार त्याला सतत बेचैन करतांना दिसतो. परंतु आसपास कुठेही उठावाचा उद्‌गार नाही. सर्वत्र लाचारी. दुबळेपणा, औदासिन्य, एक काळीकुट्ट छाया सर्व आखातभर व्यापून राहिलेली दिसते आणि म्हणून किंचित संतापाने तो, या सर्वांवर उखडतो.

**बापा परीस बाप गांडू**
**समाज पण निमगांडूच**
**इथले हिरोशिमा मामाच राहून साचविणारहेत कां शेवाळे दलदल?**
**इथले ढग भळभळणार नाहीत कां उर फुटून?**
**काळ्या चित्रांवर इथल्या चढणारच नाही कां रंग लाल?**

कवीच्या सामाजिक बांधिलकीतून आणि स्पष्ट वैचारिक प्रक्रियेतून, त्याचे हे आर्तस्वर तृटूफाटून बाहेर पडतात. प्रकाशच्या एकूण कवितेचा गाभाच सामाजिकता हा आहे. अभिव्यक्ति धबधब्या सारखी कोसळत असतांनाही, लय मात्र हरवत नाही.

सामाजिक विषयांवर लिहली जाणारी कविता म्हणजे, ढोबळ, प्रचारकी असे समीकरण किंवा तसा ( गैर ) समज करून देण्यात सनातनी समीक्षक गुरफटून गेले

आहेत. असे करीत असतांना ते आधुनिक मराठी कवितेचा इतिहासंच नजरेआड करतांना दिसतात. तुकाराम, केशवसूत, मर्ढेकर, सुर्वे, ढसाळ पर्यंतच्या मराठी कवितेची वळणं पाहिल्यास माझ्या म्हणण्याची प्रचिती येईल. आजही, केशवसुतांनी हिरव्या रंगाचा वापर कितीदा केला ! हे सांगण्यासाठी आमचे समीक्षक पानेच्या पाने खर्ची घालतात. जे समाज प्रबोधन केशवसुतांच्या कवितेच्या पाठीमागे होते. त्याचा विचार करणे आवश्यक ठरते. एव्हढंच काय. पण त्याकाळी आपला प्रेमानुभव इतक्या धीटपणे कवी कां मांडू शकला ? हा देखील एक प्रबोधनाचाच भाग आहे.

सामाजिक विषयावर लिहली जाणारी सगळीच कविता चांगली आहे असं कुणी म्हणणार नाही. शेवटी कविता म्हणून तिला एक वेगळे स्थान असतेच. पण मूळ प्रश्न असा आहे कि, एकूण सगळ्याच सामाजिक प्रश्नांकडे उदासिनतेने पहाण्याची आणि त्या पासून चार हात दूर रहाण्याची प्रवृती आपल्या साहित्यिक विचारवंतांमध्ये दिसून येते. एखाद्या प्रश्नावर कणखर भूमिका घेतली तर आपण 'ब्रॅन्ड' होऊ कि काय. या अनामिक भितीने ते सतत धास्तावलेले असतात. एक स्वार्थी पलायनवाद त्यांच्या ह्या भूमिकेतून डोकावत असतो. याच स्वार्थी पलायनवादातून मराठींतील अनेक थोर-ढोर कवींनी, आपल्या कलाकृती जीवनमूल्यांपासून दूर ठेऊन त्यावर लेखकीय मूल्यांचा जास्तीत जास्त ठसा कसा पाडता येईल ! यासाठीच आटापीटा केला आहे. कोणतीही मुल्यगर्भ जाणीव त्यांच्या उतूं चाललेल्या प्रतिभेला शिवत नाही. परिणामी शब्द चमत्कृती आणि कारागिरी यापेक्षा वेगळं काही हाती लागत नाही. केवळ शब्द साम्राज्यात हरवलेल्या मराठी कविता प्रवाहातून एक सशक्त कविता प्रवाह दलित कवितेच्या रूपाने बाहेर पडला आहे. दलित कवितेतील अनुभवविश्व इतकं सच्चं असतं कि, त्याला फॉर्म वैगेरे शोधायची गरजंच भासत नाही. प्रकाश जाधव हा याच समृद्ध परंपरेतला कवी आहे असे मला वाटते.

प्रकाशची कविता नुसतीच दुःखांची गाणी गाणारी अथवा आक्रस्ताळी नाही. दलित कवितेच्या नावाखाली आज अनेक आक्रस्ताळी कविता लिहली जात

आहे. या आरोपात अगदीच तथ्य नाही असे नाही. हा कवी मात्र बराच समंजस आणि चिकित्सक आहे. दुःखाच्या मूळाशी कोण आहेत ? दुःखाचं निवारण कसं करतां येईल ? अथवा संपाचं हत्यार उपसल्या शिवाय आपल्याला आपले हक्क मिळवतां येणार नाहीत. याची सखोल जाणीव त्याला आहे. स्वतःला चार भिंतीत कोंडून कागदांवर उसासणारा तो कलावादी कवी नाही. तो स्वतःला सैनिक समजतो आणि बुलंद आवाजात म्हणतो.

**दारिद्र्याच्या पलटणींतील काळे सैनिक आम्ही**
**काळतोंड्या बरकतीतून प्रवेशद्वारा बाहेरच्या क्षुब्ध मोर्चांत**
**प्राणांतिक श्वास अवरोधून**
**अगोदरच्या नक्ट्या हुंकारांचे साक्षीदार**
**आमच्या हाताहातांत। चलो आझाद मैदान ॥**
**अन् ओटीपोटांत। झिंदाबाद। मुर्दाबाद ॥**

प्रकाशची कविता संघर्षावर विश्वास ठेवणारी आहे. जुलमी जमिनदार आणि भांडवलदार यांच्या विरुद्ध उठाव करणाऱ्या चळवळींकडे तो आपुलकिने पहातो. त्यांचं प्रतिनिधीत्व करतो. तो केवळ स्वतःचेच अनुभव विश्व घेऊन आला आहे असेही नाही. तो ज्या दुनियेत उठतो. बसतो आणि वावरतो. त्या दुनियेतील चमत्कारीक भाषाहीं तो घेऊन आला आहे. त्याच्या दुनियेतली भाषा. पुस्तकी भाषा आणि बोलीभाषा यांचे अतिशय वेधक संमिश्रण त्याच्या कवितेत आढळते.

**खाटेखालच्या सूडगूड उजूजोडात**
**इस्तो भरलेलं पोटारपन**
**निसटता निस्टे ना घासलेटी घसरा**
**कन्नीगूल आकाशांत कायशांनी कापलेली जिंदगी भरजोल**

किंवा

**टिकाव...फावडी सगे-सोयरे मैतर**
**एकूणएक कोया बाकबूक नि कपुरे हातघायवर**
**जागेवर असलेल्या नसलेल्या फासळयांची चलबिचल सळसळ**
**कचरा पेट्यांकडे वळलेले अथवा**
**वळवलेले खुदफरेब तांडे; आयझवारे**

अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. ही भाषा कोण्या एका धर्माची नाही. पंथाची नाही. सगळी नैतिक, आध्यात्मिक बंधने झुगारून तथाकथित लोकांच्या मर्यादित जगा पलिकडे जगत असलेल्या एका असंतोषित समुहाची ती भाषा आहे. आणि दस्तख़त मधील कविता या समुहाचे प्रतिनिधीत्व करतात. आजपर्यंतच्या मराठी साहित्याने वापरून वापरून गुळगुळीत झालेले शब्द, प्रतिमा प्रकाशची कविता स्विकारत नाही. विशेषतः उर्दू शब्दांची जीवघेणी सरमिसळ ह्या कविता संग्रहात दिसून येते. अगदी कविता संग्रहाचे शीर्षक 'दस्तखत' हा देखील उर्दू शब्दच आहे. पण हे शब्द मूळीच परके वाटत नाहीत. एकूण अविष्करणात ते अगदी घरचेच असल्यासारखे वावरत असतात.

ग्रामीण कथेच्या अथवा कवितेच्या नावाखाली ग्रामीण भाषेचा वापर करून स्वतःचे आणि स्वतःच्या कलाकृतीचे हसू करून घेणारे कवी, लेखक पाहिले आणि प्रकाश जाधव सारखा तळागाळातून आलेला कवी आणि त्याची कविता पाहिली म्हणजे अनुभवातील अर्क शब्दात कसा पकडला जातो, याचे प्रत्यंतर येते. दलित कवितेतील नवा आशय, नवी भाषा, ही अपरिहार्यपणे नव्या प्रतिमा घेऊन येते. या प्रतिमा आकाशांतील ताऱ्यांशी किंवा गारगार वाऱ्याशी कल्पनारम्य नाते जोडताना दिसत नाहीत तर, भोवतालच्या सामाजिक वास्तवातून आणि तिथल्या कडू-गोड घटनांतून साकार होताना दिसतात. प्रकाशच्या कवितेचे प्रतिमा विश्व या दृष्टीने पहाण्यासारखे आहे.

**चड्डी परकर मधली अल्पवयीन सायंकाळ**
**अन् खरचटलेली बुल्ली घेऊन खसकणारा सूर्य**
**या दरम्यानचा दोलायमान माहोल**

आपण सायंकाळ नेहमी पहात असतो. गायीला पान्हा फोडणारी अथवा प्रेमिकांना हुरहुर लावणारी. परंतु ही सायंकाळ एका वेगळया स्वरूपात अवतरते. या अवघडलेल्या संध्याकाळला स्पष्ट करतांना कवि म्हणतो.

**ब्लॅक आऊट हंगामात तोल गेलेले बुझदिल झेंडे**
**कुणी हलायचं नाही। पळायचं नाही।**
**हाताची घडी तोंडावर बोट।**
**आज आपल्या स्वातंत्र्याला अमूक इतकी वर्षे होत आहेत॥**
**एक शिवी.**
**एक कविता. या निमित्ताखाली**
**मी वॉन्टेड असतो तेव्हां...**

या ओळी वाचल्यानंतर 'खसकणाऱ्या सूर्याच्या' प्रतिमेंतील भीषणता अधिक जाणवू लागते आणि अनुभव उग्र होताना आढळतो. त्याप्रमाणे, उपाशी झोपड्यातील पावनेआठ काळोख. विश्वाच्या नकाशाचे गजकर्ण. भुवयीच्या कपारीतील पिसाळलेली उल्का. पापण्यांची तावदाने. हाड फोडून कातड्यांची तल्लफ. खाजवलेला दिवस. विस्तरभोर गर्भात. गुमायित अल्ला. मुर्दे उठे और घोडे दिवाने. इकरा फॉर्टिफाइव्ह. अशा पुष्कळशा अनाकलनीय प्रतिमा दस्तखत मध्ये सापडतात.

या शिवाय कोंकणी भाषेत लिहिलेल्या कविता या संग्रहात समाविष्ट केल्या आहेत. साधारणतः आपल्याकडील वाङ्मयात विनोद निर्मितीसाठी बोलीभाषेचा सर्रास बळी दिला जातो. परंतु प्रकाश या बोलीभाषेकडे अथवा त्या कफल्लक जीवनाकडे निव्वळ 'इदीचे बकेर' म्हणून पहात नाही तर त्या भाषेमागील जीवनाची वेदना तो जाणतो आणि कवितेत पकडतो.

**पोटाच्या उज्याक कोवना आरथं आमेनाचो**
**ते बापडे वाजएता घांट**
**माक खावोंक जाय...माक निदोंक जाय**
**जाय...जाय...माक जिवोंक जाय**

जन सामन्यांबद्दल अपार सहानुभूती आणि ज्यांना सामाजिक, आर्थिक न्याय नाकारला गेला आहे अशांसाठी लढणारी ही कविता. ज्या व्यवस्थेने, धर्माने दलितांचे माणूसपण हिरावून घेतले आहे. त्या व्यवस्थेविरूद्ध एक विद्रोह प्रकाशाची कविता सतत करीत असते आणि म्हणून लोकशाहीचा नेमका अर्थ ती सांगू शकते. प्रचलित लोकशाही विषयी कवी म्हणतो.

**मारणाऱ्यांनी मारत रहावे**
**मरणाऱ्यांनी मरत रहावे**
**आया बहिणींची स्वस्त मरणे पहाता पहाता**
**लोकशाहीतील क्षुधित घुबडे उद्या माझेही मरण घेऊन उभी असतील**
**माझ्या बायको समोर निर्वस्त्र,**

लोकशाही ही केवळ शासन यंत्रणा नाही तर ती एक जीवनपद्धती आहे. परंतु या देशात लोकशाही एका विशिष्ट वर्गासाठी राबविली जात आहे. हे पाहून कवी अवस्थ होताना दिसतो. गेल्या तीस वर्षांत दलितांच्या, नक्षलवाद्यांच्या मोडून काढलेल्या चळवळींकडे आस्थेने पहातांना, निर्णायक संघर्ष हाच एकमेव मार्ग त्याला दिसतो.

**तिच्या रक्तस्नात दूरदृष्टी पलिकडे। मी। ते। सर्व**
**इतक्या उंचीवर पोहोचलोत कि,**
**जिथून साध्य करता येईल इप्सित**
**किंवा कडेलोट तरी.**

दलितांच्या चळवळीतील एकारलेपण हळू हळू दलित तरुणच नष्ट करतांना दिसतात. सरंजामी अवशेषांना आणि वर्गीय अंहकाराला उजाळा देणारी आजची राजकीय प्रवृत्ती आणि त्या प्रवृतीतून होणारी पिडीत, दलित शेतमजूरांवरील अन्याय-अत्याचाराची मालिका पाहिली कि, प्रकाश जाधव हा वास्तवच सांगत असतो. या संदर्भात बिहार, बेलछीमध्ये घडलेल्या घटना ताज्याच आहेत. या सर्व घटनांतून दलित चळवळीला एक अपरीहार्य वळण घ्यावे लागेल. आणि

तो दिवस फार दूर नाही. एकूण दलित कविता या दूरगामी वळणाचा वेध घेणारी आणि भाष्य करणारी कविता आहे. ब्रेख्त एके ठिकाणी म्हणतो, ज्यांच्यावर अन्याय झाला आहे त्यांनीच न्याय ध्यायचा असतो. दलित साहित्याचे प्रेरणा स्त्रोत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देखील या संदर्भात म्हटलेले आहेच. ज्या लोकांसाठी ही घटना आहे, ती जर त्यांच्यासाठी नीट राबविली गेली नाही तर तेच लोक रस्त्यात येऊन घटना जाळून टाकतील.

'आणीबाणीतल्या कविता' या नावाखाली लिहलेल्या कविताही या संग्रहात आहेत. पण या कवितेचे एकूण अंतरंग पाहता, गेल्या अठरा महिन्यातील आणि-बाणीशी फारसा संबंध जाणवत नाही. या आणीबाणीतल्या कवितामागे गेल्या साडेतीन हजार वर्षाची आणीबाणी उभी आहे. जिने कधी दलितांना माणूस म्हणून जगू दिले नाही. त्याना अन्न, वस्त्र, निवारा मिळू दिला नाही. आणि हीच आणीबाणी मुख्यत्वे कवीला खतम करायची आहे.

**आमेनच्या धीर गंभीर खसखशी नंतर**
**चर्चच्या उत्तुंग टोकावरल्या बेलची हालचाल नाही**
**सगळेच कसे पढी खाल्ल्यासारखे कायम**
**समाजवाद येण्याची चिन्ह इतकी सूम अन्**
**सर्द असूच शकत नाही.**

खराखूरा धर्मनिरपेक्ष समाजवाद आल्याशिवाय दलितांची, शोषितांची आणीबाणीतून मुक्तता होणार नाही. हे कठोर सत्य कवी जाणतो आणि ठामपणे म्हणतो.

**बरखास्त शहाऱ्यांखाली**
**अल्ला हो अकबरी धांदल तेव्हांपासूनची**
**सीनाझपटी सल्तनी शहेनशहांची.**
**जय पराजयी खून कसर**
**तेव्हांपासूनचे लुटारू कफिले मांडलिक पोटाखालून.**

**इ. सनांचे बलत्कार तेव्हांपासूनचे**
**अन्यायी दस्तखत इतिहासाच्या वासिहतनाम्यावर.**

आजवरच्या दलित कविता प्रवाहाच्या काही स्पष्ट खाणाखुणा या कविता संग्रहावर उमटलेल्या दिसतात. दस्तखत हा कविता संग्रह प्रकाशित होत आहे ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. आपला कविता संग्रह एखाद्या मान्यवर प्रकाशन संस्थेने प्रकाशित करावा यासाठी वर्षानुवर्षे वाट पहात बसण्याचा अट्टाहास जसा, लिटल मॅगझीनच्या चळवळींतील लेखक, कवींचा नव्हता तसा दलित साहित्य चळवळीतील लेखक, कवी सुद्धा धरत नाही. ही त्याहून समाधानाची गोष्ट आहे.

प्रस्तावना लिहित असतांना अनेक साहित्यिक मित्रांशी केलेली चर्चा उपयुक्त ठरली आहे. त्यांचा मी आभारी आहे. आणि विशेष म्हणजे, प्रकाश जाधव प्रस्तावनेसाठी थोरामोठ्यांकडे न जाता दलित साहित्य चळवळीतील माझ्यासारख्या एका साहित्यिकाकडे आला. त्या बद्दल मी व्यक्तिशः त्याचा आभारी आहे.

**२८ नोव्हेंबर १९७७**

**अर्जुन डांगळे**
**चेंबूर, मुंबई**

श्रमिकांच्या, दलितांच्या, नक्षलवाद्यांच्या चळवळींकडे
बंदुकी डोळ्यांनी पाहाणाऱ्या
व्यवस्थेला......

# अनुक्रम

आता/१
सजा/२
सस्पेन्स रस्त्यावर/३
सुरवात/४
मरण/८
माझ्या गोद्ध्डीला/९
दरवाजाच्या कडीचा अर्थ/१०
कैफियूत/११
उच्छवासाखाली/१३
दादर पुलाखाली/१४
विषुववृतीय आखातांत/१८
माणूस नामका धरम्/१९
इकरा फॉर्टिफाईव्ह/२०
इद्‌ओस/२१
झेटं फुटलेले सूर्यं/२२
चित्र/२३
असलियूत/२४
खिस्ताच्या मृतवत डोळ्यांतून/२५
अल्ला/२९
प्रार्थना करण्या आधी/३०
उत्खन्तांना/३१
जन्म/३२
पिसाळलेल्या जुलूसात/३५
शब्दांवर जगणाऱ्यांनी/३६
तेव्हां/३७
सरकारी जेबखर्चातून/३८
अंधाराच्या कनवटीला/३९
स्मशान शांतता/४०
उंची/४१
दस्तख़त/४३
उद्या/४४

# आता

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२३३६
दा. क्र. काव्य
२३४७७
शाखा (स्थळ. प्रत)

या ठार माथेफिरू प्रदेशातून
आता थरकांपत नाहीत प्राण
या राडेबाज वळचणीतूनच्या माझ्या जखमी वस्तीकडे
आता लडखडत नाही पाऊल
मुकाबल्यातूनच्या आदती डोळयांनी पेललेले
एकसे एक धोबीपछाड
आणि दरेक धुलाईनंतरचे सरकूचंद अवयव
खरंच
धम्नीतले सारे मुहल्ले बिथरलेत
आता कर्फ्यू लाऊन चालणार नाही

# सजा

अनाम मादरचोद्नी
दांडीयात्रा नेल्या तेव्हां
मी, तिच्या गर्भाशयांतील कारागृहातून
यातनांच्या रिमांड होमवर
दोनशे चौऱ्याहत्तर दिवसांची सजा कटण्या आधी.

# सस्पेन्स रस्त्यावर

। सस्पेन्स रस्त्यावर स्वतःला चालवतांना ॥
काळी सावली हलचल
दूखर नक्षलवादी सायंकाळ
फासटलेले गुडघे कोपर हल्लेखोर झाडे
लाठीचार्ज अश्रूधूर आकाश गडद
जिथं तिथं धरपकड सायसंगीत
मीच टांगला जातोय अवास सवास
खाली मिर्च्यांची उद्वन
। सस्पेन्स रस्त्यावर स्वतःला चालवतांना ॥
रोखलेली बंदूक अन् काळापहाडी धाक
‘ — ओरडलास तर
गोळया घालीन ’

# सुरवात

ही तर सुरवात शेवटच्या बसची

अंगवळणी क्षणांना डोळे लाऊन बसलेली पिलावळ
हुंगतेय कातडी आपापली
वहाणाऱ्या थंड लहरीं सोबत उठून चाललेल्या तवाएफी सावल्या
नरकांडीकडे
परसदारी पुरलेली प्रेतं चढवू लागलीत झगे
नि कपाळभर इबूतीचे पिंडकी भगत
अहमहमिका दुस्वासावर घुमवताहेत लिंबू.

ती निर्वंश, निर्विकार, पुरुन उरलेली हडळ
तिच्या हस्तपायादी सुजेवर तु, मी, दुनिया आसक्त
आपण तिच्यात उतरत चाललोत स्वाभाविक
पापण्यातून, ओठांतून, ग्लासातून, स्तनातून
रांडांच्या धंदेवाईक श्वासातून खोलवर आपली वसाहत.

तिच्या पुढे मनू-आदम राम-रहीम धर्म-कर्म
पाप-पुण्य सब घोडे...
रेपर, खुनी, भामटे, खिसेकापू, आलिबाबा आणि चाळीस चोर
तिच्या दारात सगळ्यांच्या खडावा.

बेटींगवाल्यांच्या काळ्या पाटीवर हलू लागतात आकड्यांचे सांगाडे
आणि अदमासांवर पोट बाळगणारे जुगारी
तुटून पडतायत छक्का मेंढींवर
तीन पत्त्यांची गोची कळत नाहीय असामान्यांना
जन्ना मन्न्याची कालाकांडी
पेढींतील विस्कळीत तकदीर ढिल्या करतंय कनवट्या
तर पलंगतोड गोळीची झिंग उठवून लावतेय आडदांड धुकं
पाच फूटी गोध्डीवरून
नि पाठीला डोळा नसलेल्यांची
मारली जातेय उचलून.

गलेलठ्ठ लुच्चांची दसरा दिवाळी परंपारिकतेवर हररोज
तर दाणे वेचतांना एखादा दोन होतोय रेल्वे लाईनवर
चार निष्क्रिय उचलून धरतायत आदीम भूमिका
आणि आडमूठ्या रूस्तमाना
एखादी गल्ली अॅडव्हान्स करीत नडू लागतोय
जखमांत लोळणाऱ्या अगणित अश्वत्थाम्यांना.

आकाशावेगळी झिपरी रज् हुडकीत
कचऱ्याच्या ढिगाआड बुडतांना
लाख उमर खय्याम जागे होतात स्वप्नातून
सच्चा वास्तवापुढे होकूसायची चित्रे आखूड वाटू लागतात अन् विसंगत
एखादा मौला डोकीवर मशिद घेऊन बडवतो उर
अलल्लाहू अकबर
तर आगेकूच करणाऱ्या महारोग्यांचे कफिले
बाहेच्या बाहेर पांगवून
बंद होऊ लागतात चर्चचे व्यवहारी दरवाजे.

अमुलाग्र परिवर्तनाची खाज सुटलेले मजूर
छली पाळीतल्या अनुकूल क्षणी जातायत प्रस्थापितांविरुद्ध
त्या अहिंसक उत्थानाचे पर्यवसान
झिरपत रहातो अश्रुधूर असमर्थनीय हल्ल्यातून
आणि बालबच्चेवाले सुरुंग घेऊन फिरु लागतात
निर्णायकितून.

काळोख सहस्त्र पावलांनी पळतोय चौखूर
रक्त गोठविणाऱ्या थंडीत निर्वतलेल्या माय समोर
छत नसलेलं पोर रडतं धांय धांय
नि आकाशीचा बाप्पा अंग चोरून क्रूसावर
एखादी रोशन-ए-आरा उतरवते चिपा गुमसूम किनाऱ्यावर
तर कितीक वेडे पसाभर दुःखांवर रेघोट्या ओढीत फुंकतात विड्या
डोळ्यांत रक्त उतरेस्तवर.

कुठल्यातरी खविसाला ठेवला जातोय उतारा तीन तिव्यावर
तर धुंडत असतो कुणी अघोरी
ओली बाळंतीण स्मशानाच्या वाटेवर
औषधाशिवाय गळतो फांदीवरून एखादा
नि आयाव रंडकी होतेय.

या असंबद्ध रात्रीचे
संदर्भ लागत नाहीत तात्विकांना
चार भिंतीतल्या सांद्र उजेडात
त्यांच्या सर्वदूर विचारांची उत्तुंग झेप औपचारिक अन् सरड्याएवढी
जिने उतरून खाली आल्याशिवाय
दिसणार नाही हा अपारदर्शी अंधार
किंवा कळणारच नाही;

एखाद्याचं मरण किती निर्भर असतं
जिव डोळ्यात एकवटून आर्त विव्हळणाऱ्या भालूवर.

# मरण

आज संपू दे आहुतींचे सोवळे संदर्भ
आज विझू दे अध्यात्माचे सनातन यज्ञ
उद्या आणिक एक पाहीन
रक्ताचे नाते उद्ध्वस्त होतांना
प्रथाच पडून गेलेय आता
सूर्याला नागडं करायची आणि उल्केचे कासोटे फेडायची
मलाही एक सवय जडलेय आताशः
दगड फेकून आकाश फाडायची
मेल्यागेल्यांचं दुःख होतं, संताप येतो
पण रोटी शेकल्यावर विस्तव जळला काय नि विझला काय
सारखंच.
मारणाऱ्यांनी मारत रहावे
मरणाऱ्यांनी मरत रहावे
आया बहिणींची स्वस्त मरणे पहातां पहातां
लोकशाहीतील क्षुधित घुबडे
उद्या माझेही मरण घेऊन उभी असतील माझ्या बायको समोर
निर्वस्त्र.

# माझ्या गोद्ध्डीला

एका आयन्यानं सांगितला बयना मला
। कभी उसकी याद आएगी रातको
तो उल्टा सोना ॥
खाटेखालच्या सूडगूड उजूज्वोडात
इस्तो भरलेलं पोटारपन
निसटता निस्टे ना घासलेटी घसरा
कन्नीगूल आकाशांत कायशांनी कापलेली जिंदगी भरजोल
बाराच्या विश्वव्यापी पोकळीतहीं फुटेतूना
धोस्रा घेतलेले अ-कारण डोळे
तेंव्हां खाटेवरच्या मोर्चात भूत-भूतावळ आराजक सबिने
'मुर्दे उठे और घोडे दिवाने' मसणवट्याच्या वाटेवर
फिर्की...मांजा...लग्गे...बोकाळलेली ढिनका
ढग...चंद्र...तो अंधारही हलेना
थूक लावलेल्या बेंबटात हरमासोय
सावरतांना मृत्युतोल असे
माझ्या गोद्ध्डीला सतराशे पंधरा होल.

# दरवाजाच्या कडीचा अर्थ

बिन त्रिजेच्या व्यासातून कितीक हिशेब अवघड
अन् रात्रीचे अनाकलनीय पायथा गोरस
आंत बाहेरच्या जानलेवा व्यापातून
मधल्या एकांतात सर्कवून कडी
असेच असते कां जगणे आपल्या वाट्याला ?
आपणच उकरायचे आपले खड्डे
आपणच बांधायचे आपले थडगे

# कैफियत

खाजवलेला दिवस पसरत सैरभैर
अंडरवेयरमध्ये गु–घाण अस्मिता
डेड सर्टिफिकेट खिशात ठेऊन एखाद्या प्लॅटफार्मवर, फूटपाथवर
किंवा अंधार यात्रेत बिनघोर झोकून देतांना
स्वतःचे पोस्टमार्टेम इथं स्वतःच उरकायचे असते
धर्मांधरमच्या सून्न पत्थरांवर आपटून मस्तक
न्हा अजोक
आमच्या वेदनांत अणू पेरून
मेहंदीचा रंग लाल कुणी केला प्रथम ?
हाड फोडून कातड्यांची तल्लफ कुणास आली प्रथम ?
बापा परीस बाप गांडू
समाज पण निमगांडूच.
इथले हिरोशिमा मामाच राहून साचविणारहेत कां शेवाळे दलदल ?
इथले ढग भळमळणार नाहीत कां उर फुटून ?
काळ्या चित्रांवर इथल्या चढणारच नाही कां रंग लाल ?
धर्म कोणत्या एकसोबीस मधील इलायची स्टार ?
कोणत्या एकलव्यानं खेचली नव्हती प्रत्यंचा आंगठा गमावल्या शिवाय ?
अजुनही झरतंय रक्त कातळाखालून विहिरींच्या
ज्यांना कळला नाहीय अर्थ माणूसकिचा
अशांनी रंगवू नये सूर्य रात्रीच्या विच्छिन्न अंधारात
विसरू म्हणता,
विसरतां येत नाहीत काळजावर सॉडर केलेले सल्क

सिंधू सतलजच्या मांड्यांवरून घरंगळत
टांग वर करणाऱ्या बुलडॉग जातीचे कांचन पर्वत हे
कुकर्मांच्या भूतकाळावर कफनी पसरून
रक्त मागणारे नरभक्षक हे
मुसक्या बांधून
पाठीत कडकड्या खुपसणारे आदीम निशाचर हे
महाभारतास समाजवादी बनवून भिडवावे मार्क्स समोर
कि तौलनिक मोजमाप रामायणाचे बुद्धा समोर?
नाक्यावरल्या भिक्कारचोट दाढीवाल्या
पायागत ठिंणग्याच सापडल्यात आजपावोत
। जिसके नियतमे खतरा उसके झोलीमे फत्तरा ॥
जा हटके दुकान लगा—
मी निघालोय काळोखाचा मुडदा पाडायला.

# उच्छवासाखाली

देह आपला आहे
आपला नियमित अट्टाहास
शांत अशांत आपण
राग लोभ आपले आपल्यातच बंदिस्त
उंच सखल देहाची नस्ती उठाठेव आपण करीत असतांना
आयुष्याचं गणित मांडतो कोण? मोडतो कोण?
एक प्रश्नचिन्ह. एक अध्यात्मिक ढोस
पण हातापायांचे सांगाडे आणि पाच फूटी देहांतील
बेशिस्त अवयव अथवा
डोळ्यांवरली
पापण्यांची तावदाने आपलीच असतात
पेशी सुद्धां देत असतात प्रतिसाद बाह्य प्रेरणांना
मग आपणच कां गुदमरतो
सिकंदर...हिटलरी उच्छवासाखाली?

# दादर पुलाखाली

ती पेटवीत असलेल्या यज्ञकुंडाच्या तीन विठा
ज्यावर काजळीच्या लेण्यांचे बीभत्स भग्नावशेष
निंबाच्या जळक्या काटक्याकुटक्या आणि रस्त्यांचे श्वास
घुसमटवीत फरफटणाऱ्या झिम्पालांच्या उद्दाम स्पर्शानं;
हवेत तरंगणारी अस्तित्वाची राख.
तिच्या उर्वरित खाणाखुणांचे उद्ध्वस्त शिल्प
ती ठेवून गेली
दादर पुलाखाली.

वैफल्याच्या काळोखात ती
तिच्याच झिंज्या विस्कटत असतांना
नियमित जहर पिऊन अस्वस्थ मी अख्तर
बेंबींतल्या शहाऱ्यांत बोट खुपसून
तिच्या रौख जखमांत भडाभड ओकत काळे रक्त
"। ऐ माँ बता मेरा धरम्। कौन हूं मैं ? क्या हूं मैं ?"

"। हिंदू है ना इस्लाम तू। दुनिया के वासना की बेदस्तूर चिंगारी तू।
धरम्? धरम् को मारती हूं इसपे। रंडियों का इक ही धरम् बेटे;
गांड मराने का शौक है तो लवडा जेब में रखो!"
पुलावरच्या पृथ्वीची साडी उतरवीत
माझ्या प्रश्नार्थक थोबाडावर भिरकावायची ती
किळसवाण्या स्मितांचा एकेक पत्थर.

उच्चभ्रू सांडपाण्याशी नातं सांगणाऱ्या
गांडू गटरांवर पेशाब करीत
"।कौन था वो? कौन है मेरा बाप?"

हिवतापाच्या साथीत पोळलेल्या स्तनांचे प्राजक्त
नि त्यावरील विश्वाच्या नकाशाचे गजकर्ण
खराखर खुरपीत म्हणायची "।थे कुछ हरामजादे!"

भिवयीच्या दरीतून पिसाळलेली उल्का
तडतडत निखळायची बाहेर
"।ऐ छिनाल; सही सही बता। वरना..."

"।क्या इक ही उठकर गया है, मेरे जिस्मसे?
किस किसका बताऊं नाम?
कितने आए और कितने चले गए!"

"।तुम रंडी होऽऽऽ!"
सर्पदंशाची विषाक्त किंकाळी
नकळतच निस्टायची रक्ताळलेल्या ओठांतून.

भिक्षापात्रांतच उकडलेल्या बोक्याच्या मांसाचा लचका तोंडीत निमग्न ती
दुनियेच्या टाळूवरून फिरणाऱ्या वस्तऱ्याची धार
नजरेंत साठवीत
"। मेरे पेट में भूख की चिता और उन्हें जरूरत थी,
मेरे ठंडी लाश की।"
हिर्व्या जखमांची खपली काढून
रक्तांत भिनलेला सनातन महारोग दाखवायची मला.

आयुष्याच्या निबिड अंधारातून ठेचाळतांना
"बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर!"–जिवापाड सांभाळलेल्या या स्वप्नाला
बिनदिक्कत सुरुंग लावून खिंकाळायची ती भाद्रपदांतील गाढवीण.
चुलीतल्या विस्तवावर थुंकून ती;
तिच्या आणि माझ्याही नागडेपणाचा करायची स्फोट
तेव्हा अंतकरणातील संतप्त ज्वालामुखी तुटूफाटून धावायचे हृदयाकडे
"। तेरे कपडे उतार दूंगा। तुझे नंगी कर दूंगा।"

"। अब क्या है मेरे पास ! मै देती थी खून और वह देते थे जख्म।"
बाभळीच्या काट्यांचे दात विचकून चीत्कारत
"। देखना है ना तुझे तू कहां से आया था ? किस राह से आया था ?
उतार मेरे कपडे ! कर दे मुझे नंगी और गौर से देख ले ओ कब्र,
जिसे तोड़फोड़कर तुझे बाहर निकाला था।"
पिसाळलेल्या इंद्रियांवर बर्फ कोसळीत,
माझे मूर्छित सर्द शहारे लाथाडून पळायची सुसाट
तेव्हां कितीक दगडमाती घसरायची पुलावरून.

दादर पुलाखालीच माझ्या प्रश्नांचे प्रतिध्वनी
नि भविष्याला कीड लावणारे राहू-शनी
गाडलेलीं स्वप्नं माझी,
मीच वाळत ठेवलेली नाळ तिथल्याच
दगडी भिंतींच्या खबदाडांत.

एक दिवस माँ गेली...
पुलाखालच्या रौद्र सागरांत तिच्या जहाजाचे
सुकाणू मोडले तेव्हां
सुसंस्कृत आकाशांत गर्दन मिरवणाऱ्या हिमालयांपुढे
मागत होतो जिंदगी—

आता त्या अमूर्त आठवणींशी आणि
छिन्नविछिन्न शिल्पाशी बसून रडतों कधी रिक्त वक्ताला
नाही म्हणताना, खूप कांही देऊन गेलेय ती
त्वचेखाली उठाव करणारे अनुवांशिक रोग
चेहऱ्यामोहऱ्यावर फुटत होते आताशाः
चट्टेपट्टेरी नक्षी कामाचा खुल्लम् खुल्ला पँथर मी
पुलाखाली उभा असतों तेव्हा...
कांही पांढरे पर्वत चिल्लर फेकतात, ती
तिच्यामुळेच.

# विषुववृतीय आखातांत

विषुववृतीय आखातांत
घमेली भर–भरून वाढलेली माती, खायला
टिकाव...फावडी...सगे सोयरे मैतर
एकूणएक कोया बाकबूक नि कपुरे हातघायवर
जागेवर असलेल्या नस्लेल्या फासळ्यांची चलबिचल सळसळ
कचरा पेट्यांकडे वळलेले अथवा
वळवलेले खुदफरेब तांडे, आयझवारे
पत्रछतांच्या अगणित गवाक्षांवर खुरडणारी म्हातारी नक्षत्रं
सांडल्या या हलविल्या शिवाय फांद्याबिंद्या
त्यातल्या त्यांत एकावर एक चढवत जाणारे हिजड्यांचे
आक्रमक तांडे मारत मरवत
नि उरफुट्टून स्रवणारी गटारं
श्वासांत घडीगूल
कोणत्या प्रजोत्पादनातून व्यालेली पनवती ही
जांघा खाजवणारी.
नखं कुरतडणारी.

# माणूस नामका धरम्

रात धुंड्या दीस धुंड्या
पर कोन आयताच गवशा नय
पीर धुंडया दरगा धुंडया
पर होनी को किसने टाल्या नय
जुम्मेसे बैठ्या मह्यनेसे बैठ्या
पर हज का पानी आव्या नय
खुद को धुंडया माळरान धुंडया
कोन पाक नजर गवशा नय
दीस भाय धुंडया रात बेगम धुंडया
पर माणूस नामका धरम गवशा नय

# इकरा फॉर्टिफाईव्ह

आंव पोयतां सोकाय सांजे
रोस्त्यावयर उभे फादोर ध्योन देवाक्
जांय तें ऐकाले मेवतां
आंव वोयतां सोद्दा मिसाक्
इगोरजेन पोयतां मॅक्सी, एलीफन्टा
वोयर खांला बेस्टीच घांट
आमेन + आमेन + आनी आमेन
पोटाच्या उज्याक् कोवना आरथं आमेनाचो
ते बापडे वाजयतां घांट
माक् खावोंक् जाय. माक् निदोंक् जाय
जाय...जाय...माक् जिओंक् जाय
रात आनी दीस डोले कूसाक
आंवूच रॅाक एन्ड रोल आनी कम सप्टेबर
कोनोच नाचूंक ना माजे लागी
आंव हा इकरा फॉर्टिफाईव्ह.

# इद्ओस

येटकऱ्याचा निरोप मिल्ताच पेटकऱ्यांनी
धडशा नदरेन् बगित्लीन पागं खायला आवूर
पान्या खायलं इयात
पान्या खायलं मरान
गाय वासार गाढाव बक्कार कुत्तार
सारा पान्या खायला भोग.
आलं वरीस घाल भरीस
आड्या वख्तात कोन इख दिया मांगंना
येका वख्ताची ढयाकार दिया मिल्लना
काल्जातल्या रग्ताचं बी पानीच.
कंचा देवान् घडवलान आम्चा जीव
कल्लना कंदी येल मरान—
त्ये बी सालं खॉट लाऊन गांडीला इनूस खोताच्या परसांवनात
पानी पडो ना पडो, शाटमारी
आमचे म्होरला इद्ओस मातूर थामलाय
आसं कंदी घडल्ना.

# झेटं फुटलेले सूर्यं

पाठीवरल्या झोळीत उद्याला गुंडाळून फोडलेली दुपार
येसवा झालेय.
डोयीवरल्या घमेल्यातून वाढवलेले कुतूबमिनार
बेज्यान झालेत.
दोन दोन हातांनी उपसलेली विष्ठा
मसणकऱ्यांच्या पान्थळ जम्नीत सोनखत झालेय.
सांग, कुणी लांबवलेले हे डांबरट
कुणाचे वरपताहेत तळवे ?
तुझ्या डोळयांतली कोयनाही जे डबलघोडा समजून प्यायले
त्या सरमसांड्यांसाठी
तू नाचणार नाहीस आज
नशिबाला झेटं फुटलेले सूरयं उगवतीला चाललेत.

# चित्र

ओशाळलेल्या पापण्यांवर एक चित्र उभे
वयात आल्या पासून
विटलेल्या घडूतांतील फाटलेले स्तनकडे
आभाळ कोसळल्या पासून
भुवयीच्या ढोलींतील खवळलेले डोळे
कुंकू विस्कटल्या पासून
शेवाळलेल्या कांठावर शहारलेले लव्हाळे
पूर ओसरल्या पासून.

# असलियत

तिच्या कुशीत रूतत चाललेल्या
माझ्या हाडांचे विद्रूप तजरूबे
व्यवहारी कुंचल्यांनी चितारलेत न कळत
छत नसलेल्या घराचे दरवाजे बंद
नि दरवाजा बाहेरील युद्धखोर लपविले गेलेत.
सूर्ख स्तन कुरतडणारी पिलावळ
रस्ते हुंगणाऱ्या कुत्र्यांत बेमालूम घुसतांना
नवथर अनामिकांचे उर कण्हतील क्षणभर
आमाळ दाखवलं गेलंय माझं नसलेलं निळंभोर
विष्ठेखालची थकिस्त फूटपाथ वगळली गेलेय.

# ख्रिस्ताच्या मृतवत डोळ्यांतून

जिथे मुमताजच्या अनावृत मांड्यांची इस्टमनकलरी छतं
तग धरून असतात इमान धरमवर
त्या काळ्या बेटांतल्या काळ्या राजाचं,
उगाच कण्हणाऱ्या भोवतालच्या उन्मत्त हवेल्यांवर
कळवळून थुंकणं.

त्याच्या क्लांत दगडी चेहऱ्यावर
कायम वसाहत करून राहिलेली शतकांची वेदना
आणि पापणीत दबा धरून बसलेली वर्णभेदाची ठिणगी
काळ्या पाईपांत व्यापलेला तो
गोठलेली जखम स्त्रवू लागते तेव्हां,
पाहूं शकत नाही
एखाद्या कामगाराचा युनयनिस्ट संघर्षातून पाडलेला खून
किंवा लमान्यांच्या निष्कलंक आयन्यातील
मुकादमाची बलत्कारी सूरत.

गस्तवाल्यांच्या नजरकैदेतून दुणावतंच गेलेली खुन्नस
तो उठतो. पळतो. पिच्छा पुरवितो.
दुनिया झुकती है च्या रोगानं पछाडलेल्या संस्कारांना
धू–धूतो. एखाद्या वळचणीत
करतो वार पोटावर अन् इतस्ततः

म. ग्रं. सं. ... ठाणे
२२३३६
दा. क्र. काव्य
२३४५
... शाखा (स्थळ प्रत)

कायदा हातात घेण्याच्या
आधीच्या व नंतरच्या पद्धतीतील एकसुत्रता पडताळल्या नंतर
जीप विस्कटते अड्डे-अड्डे
नि सावलीशी प्रतिबद्ध असलेली पावलं इथून तिथून
त्याच्या पर्यंत.

त्याच्या पदस्पर्शानं टर्कणारी
अंदरची निलाजरी नसंनस
अन् इज्जत करणारे सलामबाज पहारें
तो चुपचाप हवाले करतो स्वतःला
आड्यावेडयांचं न उठवतां माहोळ.

या दरम्यान गल्ली हरवते आसरा
फुटपाथी भाकतात प्रार्थना आणि व्हिर्वा सरफरा होतो दर्ग्यावरला
पुष्कळसे नवे किडे
अंतर सोडून वळवळू लागतात
एखादा फिगर
एखादी चक्री उलटवूं पहाते इतिहासाची चक्रे
तर काळोखाच्या फांदीला आखून माखूनचा प्लॅन
साडेतीन रुपयाची जिंदगी दिग्दर्शित करतात लुंगे सूंगे
एखाद्यातला सुप्त हिटलर आत्मविश्वासाने चाकू कुरवाळत
हलवतो छत '-के आने दे उसे
म्मा चोदके रख्ख दूंगा-'

व्यवस्थे विरुद्ध प्रथम लढतानाचा
एकुलता एक कडकडया खोलून काळा राजा
इदरीस बावाच्या चिलमधून
सकाळ सायंकाळ फुंकणाऱ्यांना देतो हाग्यादम
'मै आयेला हूं वापस—'
चढ चढून ढिलढाल केलेल्या फोद्यासारखी
वस्ती उघडते डोळे
आणि उसासते त्याच्या काळजापर्यंत थेट.

जाम फुगलेलं ब्लॅकलिस्ट
कलमं लागलेलं आयुष्य
अजिबात पर्वा नसलेला तो अद्वातद्वा बोलतो
राष्ट्रध्वजाबद्दल अनुद्गार काढतो
बदनाम वस्तीत भारदस्त पावलांची ये–जा पूर्ववत
अन् स्थानबद्धतेचं वॉरन्ट फर्लांगभर अंतरावर
तो मात्र बोलतंच असतो
लोकशाहीवर...उपासमारीवर...क्रांतीवर

। माणूस हा सर्वप्रथम माणूसंच राहिला पाहिजे ॥
। सर्वंकष क्रांतीका वक्त आ गया है ॥
। गरीबी हटाओ ॥ वगैरे. वगैरे.

तो पाहूं शकत नाही
ख्रिस्ताच्या मृतवत डोळ्यांतून
घोषणांच्या बहकाव्यात काळं बेट विरघळतांना.

# अल्ला

। देगा उसका भला
न देगा उसका भी भला ॥
या कफल्लक भूमिकेतून
दुवा देत पांगलेले लाखो फकिर
परतले तेव्हां,
तो गुमायीत अल्ला
कुणाच्याही झोळीत उतरला नव्हता.

# प्रार्थना करण्या आधी

फुटके टिनपॉट गळवतांना
कडी लाव दरवाजाची
बायबल असेल तर ठिक. नसेल तर
महाभारत घे घडी करून
उपाशी झोपड्यांतील पावनेआठ काळोखांत
बाप्तिस्मा उरक
पांढऱ्या झग्याखाली मोक्ष कुजव
आत्मे सडव
कन्फेशन्स घोकत नियत वाकव
दानत फुगव
प्रार्थना करण्या आधी
एकदा गांड धुवून घे.

# उत्खनतांना

या दिशांघरण्यांतून उत्खनतांना
जरी केले वार निःहातांवर कुणी आडून
त्या वांझ बेटावरल्या रखरखीत टोंकावर
घेऊन गेलेली महाचूक माझीच.
भळभळणारे रक्त ताजे असले तरी,
चिरफाळलेल्या पंखांसकट मी आकाशाचा
अन् आकाश माझे
ही काळ्या दगडावरली पांढरी रेष.

# जन्म

हे कोणतं प्रदूषण आकाशभर
वेढा दिलेल्या रस्त्यातून भाडोत्री दिव्यांची गस्त
तर गल्ली बोळांनी वाटून घेतलेला अंधार आपापसांत
प्रकाश इतक्या सहज माघार घेईल
वाटलं नव्हतं
रक्त इतक्यातच उद्घाय करील.
धडावरून जाणारे जोहान्सबर्गचे उष्ण वारे
नि उठाव करीत गेलेल्या व्हिएतनामी पेशी
समझोत्याचे तमाम तह फेटाळून
आतल्या आंत सर्किट
दूर व्हा—
वेदनांचा स्फोट होतोय
आणि स्वातंत्र्याचा जन्म.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# आणीबाणीतल्या कविता

क्षितिजाच्या पायथ्याशी
जळणारं तुझं घर दिसतं इथुनही,
वाट पाहूं नकोस....
उलट्या काळजाच्या हज्जार नजरा
थांबून राहिल्यात माझ्या हालचालीवर
कडीकोट.

# पिसाळलेल्या जुलूसात

दारिद्र्याच्या पलटणींतील काळे सैनिक आम्ही
काळतोंड्या बरकतीतून
प्रवेशद्वारा बाहेरच्या क्षुब्ध मोर्चांत
प्राणांतिक श्वास अवरोधून
अगोदरच्या नक्र्या हुंकारांचे साक्षीदार
आमच्या हाताहातांत। चलो आझाद मैदान ॥
अन् ओटीपोटांत। झिंदाबाद। मुर्दाबाद ॥
गस्त-ए-पावलांखाली
भयाकूल फुटपाथ स्फूंदताहेत बेलगाम रस्ते
भूत भविष्य झुगारून शतके स्थितप्रज्ञ म्मा समोर
पानं पुसलेलं तोंड आमचे आंधळे आंगठे कोऱ्या मेहनतान्यावर
तिजोरीतल्या आमरण कारावासांत लाल कष्ट कैद
लाल पसिने
रक्तातल्या तरंगत्या प्रवाहातून लाल सूर्य तयार अगदी भर दुपार
पिसाळलेल्या जुलूसात आम्ही
तडकलेल्या आवाजाचे लक्ष लक्ष प्रतिध्वनी.

# शब्दांवर जगणाऱ्यांनी

माझ्या निषेध मोर्चांनाही द्यावे लागले
रक्त अभिषेक
त्या बेमन जन्मीत
'मुंबई बंद'चे अनैतिक व्यभिचार वाढूं कां दिले ?
मला समजलं नाही.

उभयान्वयी ठिंणग्याना जाळ पुरविणारे
बंडखोर किडे
नंतरच्या मौसमात
हात झटकून रस्ते कां बदलत गेले ?
मला समजलं नाही.

अनिर्बंध आकाशात जीवन टांगणाऱ्या निष्पाप सूर्यांना
शब्दांवर जगणाऱ्यांनी
संपाच्या रेताड धुळीत कां लोळविले ?
मला समजलं नाही.

बधीर वस्तींवरले सशस्त्र हल्ले परतवित
शहरा शहरांवर उगारले हात
तेव्हांही,
। आपली कबर आपणच बांधतेय मेणबत्ती ॥
माझ्या मृत्युची झुठ खबर पसरविण्यात कां आली ?
मला समजलं नाही.

# तेव्हां

चड्डी परकर मधली अल्पवयीन सायंकाळ
अन् खरचटलेली बुल्ली घेऊन खसकणारा सूर्य
या दरम्यानचा दोलायमान माहोल
माऊन्ट मेरीच्या पायथ्यांत घुटमळणाऱ्या फटीचर लाटा अथवा
नरीमन पॉईंटकडून हलविलेल्या छावणींतील निर्वासित तुकड्या
जिथल्या तिथं पालथ्या
गस्त...कर्फ्यू...एस. आर. पी...उगाचंच
लढावू मिगची गिद्धस्त घरघर डोक्यावर
आणि पावलांखाली एकमेकांच्या असंख्य सावल्या तुटलेल्या फाटलेल्या
बॉंब कोसळत नाही किंवा गोळीबारही
एक अस्खलीत अफवा.
युद्धबंदीचा सायरन फिरवला जातोय मलबारहीलवर
पोंटावर आणि पोंटाखाली झोपलेल्यांना अटक फक्त
ब्लॅक आऊट हंगामात तोल गेलेले बुझदील झेंडे
। कुणी हलायचं नाही। पळायचं नाही
। हाताची घडी तोंडावर बोट।
। आज आपल्या स्वातंत्र्याला अमूक इतकी वर्षे होत आहेत ॥
एक कविता. एक शिवी-
या निमित्ताखाली
मी वॉन्टेड असतो तेव्हां...

# सरकारी जेबखर्चातून

सरकारी जेबखर्चातून
ऑर्थर रोड ते येरवडा प्रवासतांना
हताळलेली हत्यारे पोरकी होतानाची खंत वाटत नाही.
आडीबाज बोलती बंदतून
बेमुदत धुतला जातांना
बराक बाहेरल्या नंबरी चेहऱ्यांवर उगाच गुस्सा चढत नाही.
ब्लॅक लिस्ट वाचूनच्या निल्कर्षातून
नालबंदी चढतांना
प्रसव वेदनेच्या कळांनी माथे फिरत नाही.
'बाहेरचे उर्वरित भूमीगत
दम तोडणार नाहीत' या अदरार विश्वासावर निशंक जगतांना
कारावासाचं दलभद्री भय नखशिखान्त टर्कवत नाही.

# अंधाराच्या कनवटीला

तीन दगडाच्या चुलाणाशी थापून ठेवलेला काळा सूर्य
एका मुष्किल वक्तावर पंख फुटलेला काळा सूर्य
तिनं काळ्या सूर्याची निथळणारी मध्यान्ह पाहिली
तिनं काळ्या सूर्य काळ्या मातीत एकजीव होतांना पाहिला
तिनं काळा सूर्य वितभर ढगात अंग लपवतांना पाहिला
तिनं काळा सूर्य मावळतीच्या कुशीत अश्रू ढाळतांना पाहिला
निर्णायक पाऊल उचलेपर्यंत तिलाही कल्पना नव्हती
जिथं तिथं उठावाची बात चालली होती.
तिच्या मागे टाळेबंद अंधार
तिच्या पुढे अंधाराचे जुलूस
दिवस रात्र आठवडे महिने शतकांच्या नमक हरामपणावर
डोळे वटारलेला काळा सूर्य
ती तस्सीच संदर्भांच्या दुनियादारीतून
गावकुसा बाहेरल्या अदृश्य ठिपक्याकडे
पायाखालचा घातपाती रस्ता अन्
बोट धरून नेणाऱ्या कंगाल सावल्या वळत पळत परेशान गल्लीतून
खदखदा हसणारा काळा सूर्य
आणि अंधाराच्या कनवटीला लोंबणारा ख्रिस्त
तिचा थरकांप उडवत होता.
तिचा थरकांप उडवत होता.

# स्मशान शांतता

अगदीच कसं उजाड उजाड अन् भकास
एखादा पंतप्रधान उलथावा तशी प्रेतकळा शहरभर
काल विस्कटलेल्या मोर्चांतील एकही कामगार परतला नाही.
काल उडालेल्या चकमकींतील
एकही गनिम जिवंत वा मृत नाही.
रेल्वे, बसेस, हॉटेलं, देवळे, मशिदी, दारूअड्डे, दवाखाने,
घरांचे दरवाजेच काय—
आमेनच्या धीर गंभीर खसखशी नंतरही
चर्चच्या उत्तुंग टोंकावरल्या बेलची हालचाल नाही.
सगळेच कसे पढी खाल्ल्यासारखे कायम
समाजवाद येण्याची चिन्ह इतकी सूम अन् सर्द असूंच शकत नाही
काल व्यासपिठा भोवती गोळा झालेलं चुतियापण अथवा
घोषणांचा अस्फूट चित्कार सुद्धा नाहीच.
ही स्मशान शांतता
युद्धपूर्वची तर नसेल, ना !

# उंची

मी। आम्ही। हिशेब मागितला।

।ती सेफ नव्हती।

तिनं अवधी मागितला।

। दिला १।२।३।४।५।६।७।८।९।१०।११।१२।१३।१४

१५।१६।१७।१८।१९।२०।२१।२२।२३।२४।२५।

२६।२७।२८।२९।३०। वर्षे।

एखाद्या पारडीला वयात यायला १४ ते १६ महिने लागतात।

एवढ्यात ३० बाळंतपणं झाली असती बिनधोक।

आणि तुला तर चड्डी बदलायला इतका वेळ।

। उगाच नाहीय थांबले

। उतरंड लागली असली तरी,

विचार आणि

निष्कर्ष चिरतरूण माझे आजतागायत।

ती तस्सीच बॅलन्स सांभाळत

स्टडीरूम ते कॉन्फरंसरूम आणि दौऱ्यावर.

कधी। कधी। कधी। कधी।

हजारो। लाखो। कोटी तोंडं। कधी देणारहेस हिशेब।

। थांबा; शोधतेय।

प्रश्न वाढत चाललेत।

माना मोडत चालल्यात।

। कुणी सांगितला होता
वेडझवेपणा मानेवरुन वहाण्यास ?
तिचा, सखोल अभ्यासातूनचा
वादग्रस्त प्रश्न.

अवधी संपलाय। तोल चाललाय। टोक कलंडलंय।
उंची वाढत चाललेय। प्रश्नांची।
भिकाऱ्यांची।
बेकारांची।
असंतोषाची।
प्रेतांची।

। परराष्ट्रीय संबंध दृढ करूंया
। घटना दुरूस्त करूंया
। एस. आर. पी. मागवूया
। आपण उंची कमी करूंया।

तिच्या रक्तस्नात दुरदृष्टी पलिकडे। मी। ते। सर्व
इतक्या उंचीवर पोहोचलोत किं,
जिथून साध्य करतां येईल इप्सित
किंवा कडेलोट तरी।

# दस्तख़त

बरखास्त शहाऱ्यांखाली
अल्ला हो अकबरी धांदल तेव्हांपासूनची
सीनाझपटी सल्तनी शहेनशहांची.
जय पराजयी खून कसर
तेव्हांपासूनचे लुटारू कफिले मांडलिक पोटाखालून.
इ. सनांचे बलात्कार तेव्हांपासूनचे
अन्यायी दस्तख़त इतिहासाच्या वसिहतनाम्यावर.

# उद्या

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
२२३३६
दा. क्र. ९१०५
२३७८
शाखा
REFBK-0022336
REFBK-0022336

महाराजांची आज्ञा शिरसावंद्य मानून
सर्कलेल्या मशाली परतल्याच नाहीत खैबर खिंडीतून
कुंकू पूस. शोक आवर.
पांढऱ्या कपाळावर उडतील शिंतोडे
उडू देत.
पण त्या अंड्यांवरली उब काढूं नकोस इतक्यात
तुझ्या बिस्तरभोर गर्भांत शिलगून उठूं दे लाख पिल्लं
आपण हे शहर काबीज करू उद्या
आपल्यासाठी.